# MINUTES OF PUBLIC HEARING OF PROPOSED EXPANSION AND MODERNIZATION IN RESPECT OF M/s. BHARAT PETROLIUM CORPORATION,

**VILL: MAHUL, CHEMBUR, MUMBAI 400-074**

| | | |
|---|---|---|
| **Date of Public Hearing** | : | **25/09/2012** |
| **Time** | : | **11.00 hrs** |
| **Venue** | : | **Community Hall, The Fine Arts Society, R. C. Marg, Chembur, Mumbai – 400071** |

**Preamble**:

M/s. Bharat Petroleum Corporation Limited (BPCL) has proposed three projects namely, (1) Hydrocracker unit (Euro 4 and Euro 3 MS and Diesel) by revamp and setting up of new Continuous Catalytic Regeneration Reformer (CCR). (2) Construction of new integrated Crude Distillation Unit (CDU) and New Vacuum Distillation unit. (3) Conversion of Existing Catalytic Reforming unit (CRU) to Isomerization unit at their refinery Mahul, Chembur, Mumbai, Maharashtra. The matter regarding same was discussed in 34$^{th}$ meeting of Expert Appraisal Committee (industry) meeting held on 13$^{th}$ -14$^{th}$ April 2012 and the proposal was recommended to Ministry of Environment and Forest (MoE&F) Govt. of India New Delhi . Ministry of Environment and Forest, Govt. of India New Delhi issued their Terms of Reference (TOR) for CCR projects vide letter no- F. NO. J-11011/582/2011-IA II (I) dated 16$^{th}$ July 2012 copy enclosed herewith as annexure-I and for CDU project vide letter no- F. NO. J-11011/140/2012-IA II (I) dated 13$^{h}$ July 2012 copy enclosed herewith as annexure-II. It has been mentioned in the said TOR that public hearing issues raised and commitments made by the project proponent on the same shall be included separately in EIA/EMP report. As per the provisions of the EIA Notification, Ministry of Environment & Forest, Govt. of India dated 14$^{th}$ September 2006 as amended thereto, such projects requires public hearing prior to environmental clearance from the Ministry of the Environment Forest, Govt. of India.

Accordingly, project proponent, M/s. Bharat Petroleum Corporation Limited (BPCL), submitted an application to Maharashtra Pollution Control Board (MPCB) for conducting Public Hearing as per the provisions of EIA Notification -2006 and TOR issued by MoE&F, Govt. of India New Delhi. In this connection, MPC Board decided to hold public hearing in respect of the said projects on 25$^{th}$ September, 2012 in consultation with District Collector, Mumbai (Sub-urban). Maharashtra Pollution Control Board published public notices in Marathi newspaper namely "Maharshtra Times" and English newspaper "Indian Express" on dated 24/08/2012 mentioning about date, time & venue of Public hearing. The banners indicating event were displayed at prime location in Mahul village and in close proximity of the project so as to arrange wide publicity in the said vicinity. The appeal was made to concerned to submit objections, suggestions, complaints, comments, if any, in respect of the said project to concerned regulatory authority (Expert Appraisal Committee) it was also mentioned that written responses will be accepted by regulatory authorities till the date of public hearing and during the course of public hearing also. The venue for the said public hearing was decided at Community

Hall, Fine Arts Society, R. C. Marg, Chembur, Mumbai - 400071. The said venue was finalized considering easy accessibility to local peoples and close proximity to the proposed project.

Copy of draft E.I.A. report along with executive summary in respect of the said project were made available in English/ Marathi in the following offices to apprise the public.

1) District Collector, Mumbai Suburban District, Administrative Building, 10th Floor, Near Government Quarters, Bandra (East), Mumbai-400 051.
2) Environment Dept. Govt. of Maharashtra, 15th floor, New administrative Bldg. Mantralaya, Mumbai.
3) Asstt. Commissioner, B.M.C., M-West ward, Chembur Station Road, Chembur (E), Mumbai- 400 071.
4) General Manager, District Industry Centre/ Directortae of Industries, ICL Bldg., Opp. Tata Nagar, V.N.Purav Marg, Chunabhati (E), Mumbai-400 022.
5) Regional Officer (HQ), MPC Board, Kalpatru Point, 3rd floor, Opp. Cine Planet Cinema, Nr.Sion Circle-(E), Mumbai- 22.
6) Regional Officer- Mumbai/ Sub-Regional Officer, Mumbai-3, Shri Chatrapati Shivaji Maharaj Mandai Municipal Market Building, 4th Floor, Mata Ramabai Ambedkar Road, Mumbai- 400 001

All these authorities were requested to arrange wide publicity within their respective jurisdictions.

A public hearing panel comprising of the following members was constituted by Maharashtra Pollution Control Board in accordance with the EIA Notification dated 14th September, 2006 and as amended thereto issued by Ministry of Environment and Forest, Govt. of India.

1. Shri. Shivaji Patil - Chairman
   Addl District Magistrate,
   Mumbai suburban Dist.

2. Dr. J. B. Sangewar - Member
   Regional Officer,
   Maharashtra Pollution Control Board, Mumbai.

3. Shri. P.V. Patil - Convener
   I/c. Sub-Regional Officer,Mumbai-III
   Maharashtra Pollution Control Board, Mumbai.

## MINUTES OF PUBLIC HEARING:

At the outset, on behalf of convener of the public hearing panel, Shri. R.R. Vasave, Sub-Regional Officer Mumbai-II, MPCB welcomed all those present and commenced the public hearing. He apprised the people with the introductory information about the purpose of the public hearing and appealed them to come forward with suggestions, complaints, objections & comments, if any, about the environmental aspects of the proposed project. He thereafter requested Hon'ble Chairman to commence the hearing procedure.

Hon'ble Chairman briefed people about the concept and objective of Public Hearing. He made an appeal to participants & all to attend the public hearing peacefully and place their views regarding Environment aspect. He stated that videography of the said public hearing is being carried out by MPCB as per the procedure laid down in EIA Notification 2006. Chairman further stated that the presentation about the proposed projects will be given by the project proponent and then the questions/ objections shall be raised by participants. He made an appeal to participants to come forward with their name & address before raising any query/objections so that the name of the participant along with views will be included in the proceedings of meeting. Then Chairman requested project proponent to give the presentation of the projects along with its silent features.

On behalf of project proponent, Ms. Supriya Sapre, Manager (Energy & Environment) made a Power Point Presentation on the Environment aspects of the projects including salient features of EIA Report in Marathi as well as in English language. The project proponent elaborated the details of proposed project on following grounds.

- Project Description.
- Base Line Data with respect to Air, Water, Land, Noise, Ecology, Settlements, etc.
- Impact likely to occur due to the project on Air, Water, Noise, Hydrology, Settlements and Bio-diversity and forest.
- Mitigation measures and Environment management plan for the project during construction phase as well as operation.
- Other details as outlined in the EIA Report.

Thereafter, convener of Public Hearing announced that the forum is open for question answer. The summary of issues raised and reply submitted by project proponent is as below.

## STATEMENT OF ISSUES

1. Mr. Rajkumar Sharma – Diamond Garden, Chembur

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | Mahul area is the most polluted place in Chembur, hence people living in this area should be made aware about the new plants coming in BPCL Refinery. The proposed project may be beneficial to local people. But MPCB has not given wide publicity about the proposed project. So it is not possible for me to comment about the same. So I request authorities to make available copies of EIA, so that I will study and could comment on it in due course of time. | The convener of public hearing clarified that, wide publicity regarding upcoming project of M/s. BPCL was arranged as per procedure laid down in EIA Notification 2006. Public notice was published in leading news papers and copies of EIA report, Executive summary were made available in the offices of Authorities so that concerned people shall study and respond. The posters, banners were displayed in the vicinity of project so that nearby peoples may get aware about it. So it will not be appropriate to conclude that wide publicity was not made by Authorities. |
| 2 | How much area will be utilized for proposed plant? Please specify the area statement with total plot area of existing refinery. | Project proponent explained that, total area of the refinery unit is 450 acres, out of which 15 to 16% area is occupied by process units. Remaining working area is occupied with storage tanks. Proposed new plant will require space of 250 mtrs. x 100 mtrs.which will be made available by vacating existing storage tanks. |

2. Mr. E. C. John – Secretary of the Mysore Co-op. Housing Society, Chembur

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | I am secretary of Mysore Co-op Housing Society and representing 600 residents of society. I would like to bring to notice of panel that wide publicity regarding project & its environmental impact is not arranged. So EIA report shall be made available to all nearby residential societies. Also BPCL shall not be allowed to take any effective step unless detailed study of EIA and impact shall be studied by local peoples. | The convener of public hearing clarified that, wide publicity regarding upcoming project of M/s. BPCL was arranged as per procedure laid down in EIA Notification 2006. Public notice was published in leading news papers and copies of EIA report, Executive summary were made available in the offices of Authorities so that concerned people shall study and respond. The posters, banners were displayed in the vicinity of project so that nearby peoples may get aware about it. So it will not be appropriate to conclude that wide publicity was not made by Authorities. |

| | | |
|---|---|---|
| | | The Chairman finally intervened that protocol for public hearing is followed by MPCB and briefed about role of public hearing Panel. |

3. Mr. Deepak Wadhwani – Ashish Cinema Bldg.

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | I fully agree with Mr. John and I am staying in the same vicinity. It may be agreed that protocol of public hearing is being followed, but problems of area shall not be ignored. There are various problems of Chembur regarding traffic conjection and pollution. So the circular of public hearing along with details shall be sent to all the societies. | Mr. S.S. Sunderajan, on behalf of project proponent replied that the main aim of project is to reduce vehicular traffic as most of the products are being transported through pipelines from refinery to Sewree, Uran and Mumbai-Manmad-Bijwasan-Piyala Pipeline (MMBPL) upto Delhi. LPG from refinery will be sent by pipeline to Uran by March 2013, which will reduce need of tanker/ rail wagons in future.<br><br>The convener of public hearing explained that, as per the well settled procedure of public hearing, distribution of circular to individual societies is not expected. |

4. Mr. P. S. Ranade – Bal Vikas Sangh, Chembur

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | Notice of the Public Hearing is not available on website and banners not displayed in the vicinity. The presentation made focused on CSR initiatives. Lot of changes have taken place in this area in the last many years. Please provide a leaflet on the presentation made today. I want to know what will be impact on environment. Presentation made by BPCL is good, but actual implementation is not carried out. | Convener expressed that notice of the public hearing is to be published in leading news papers as per provisions of Notification. MPCB has followed the protocol and arranged wide publicity by displaying posters/ banners at the gate of industry and eight prime locations in Chembur. Copies of EIA report and allied documents were placed in the offices of authorities, so that concerned people can study them. It is not possible to serve these copies to individuals.<br><br>Mr. SS Sunderajan, on behalf of project proponent replied that M/s. BPCL is leading Public Undertaking company and is aware about its corporate social responsibility (CSR) towards society and environment. The |

| | | |
|---|---|---|
| | | proposed projects of BPCL are being projected with clean fuels like RLNG with zero percent sulpher content. So the emissions like Sox, NOx are being minimized. The waste water generated from the process will be treated in existing ETP and recycled back so as to conserve natural resources.<br><br>Existing four plants CDU1, CDU2, HVU/FPU will be replaced with advanced and integrated new CDU/VDU unit in which heat recovery technologies will be employed so as to save fuel upto 125 MT/day. Catalyst will not be used in the new plant which will improve its economy.<br><br>The ISOM plant will be useful to provide Euro 4/5 fuels to society, which will minimize vehicular pollution and will protect the environment. He expressed that all the facts regarding proposed expansion are elaborated in detail in EIA report. |

5. Mr. Ayub Khan – Social Worker of NGO

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | How can one know about public hearing if advertisement is published in only two news papers? So, we need one more week for studying the report and comment on it. | Convener expressed that, notice of the public hearing is to be published in local and vernacular newspapers as per provisions of EIA Notification, 2006. MPCB has followed the protocol Hence, now it is not possible to provide extra time to respond. |

6. Mr. AvinashTambe – Kurla resident

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | I was staying earlier in Chembur and now shifted to Kurla. I would like to suggest MPCB to display banners/posters for Public Hearing at prominent places like railway-station, Chembur Naka so that more awareness will be created among | Convener expressed that MPCB has followed the protocol and arranged wide publicity by displaying posters/ banners at the gate of industry and eight prime locations in Chembur<br><br>Mr. SS Sunderajan, GM (Ops.) of BPCL |

| | | |
|---|---|---|
| | public.<br><br>In case of disaster, what measures will be taken by BPCL? There should not be residential area in the periphery of 3 to 5 km from such type of sensitive industry as followed in foreign country. | replied that they are well equipped with on-site & off-site Disaster Management Plan. HAZOP studies are made for proposed plant at the design stage for improving safety factors. Interlocks are available for safe shutdown the plant in case of any emergency. Fire water adequacy was checked as per OISD norms. Mutual Aid is also implemented amongst all the industries in Chembur. During the Mantralaya fire, it was BPCL's fire engine which helped to put off the fire at the top of the bldg. We are prepared & equipped for the worst case scenario with the best technology available. |
| 2 | What about safety & Security measures during war time and terrorist attack? | Mr. SS Sunderajan, GM (Ops.) of BPCL replied that old LPG spheres have been mounded with bullets to increase safety. Mock drills are being carried out in plant, so that workmen will be alert and prepared in case of any emergency. During 1971 war, some of the units were kept shutdown and the flare in the refinery was put off as a part of security measure. For the security of the refinery, we have employed Central Industrial Security Force (CISF) which is well equipped and renown organization in the field. |
| 3 | What are the queries raised by authority like MPCB, Central Govt. after receipt of project proposal which may be in interest of public? | Convener replied that, the expert committee constituted under EIA Notification has scrutinized the proposal & communicated various points to be cleared / responded by BPCL through TOR. M/s. BPCL has studied all the allied aspects and same has been included in draft EIA report. |

7. Mr. E. C. John – Secretary of the Mysore Co-op. Housing Society, Chembur

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | Respected Chairman, you are here as a Jury between BPCL and MPCB. I am not against the development of production of Euro 4 fuel, but I want to know, what would be the impact of | The Chairman replied that, it is not true that I am here as a Jury, but I am presiding over the public hearing as per provision of EIA Notification. As per procedure of public hearing, all your questions will be included in |

| | | |
|---|---|---|
| | new project on nearby people? Why this kind of public hearing is required? I think there must be some hidden agenda, otherwise public hearing will not be required. Also I would like to suggest that environment Impact study report should have been circulated to close vicinity by project proponent. | the proceedings of hearing and same will be submitted to MoEF for their review and decision.<br><br>Mr. SS Sunderajan, GM (Ops.) of BPCL replied that Public Hearing is required if there is increase in capacity of any existing plant in the refinery as per revised EIA Notification. We are increasing capacity of CCR Project from 0.9 MMTPA to 1.2 MMTPA in existing refinery. The public hearing is being conducted as per TOR issued by Expert appraisal Committee constituted by MoEF. |

8. Mr. Rajkumar Sharma – Diamond Garden, Chembur

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | Presentation should be made by MPCB instead of BPCL. | MPCB is acting as convener body and presentation regarding project is to be submitted by proponent as per provisions of EIA Notification 2006 |

9. Mr. E. C. John – Secretary of the Mysore Co-op. Housing Society, Chembur:

| Sr. No. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|
| 1 | What is the present scenario of emission level? | Mr. SS Sunderajan, GM (Ops.) of BPCL replied that $SO_2$ emission of 13 T/D was permissible in 2005. After commissioning of Refinery Modernization Project (RMP), the emission level was bring down to 12 T/D. After commissioning of these three projects, Emission levels will come down to 11 T/D. These emission figures are displayed as real time on the electronic board, located near the BPT-Wadala Road and are also transmitted to CPCB online. |

10. Mr. Ramesh Patil – Mahul Village

| Sr. | Issue raised | Comments/commitments made |
|---|---|---|

| No. | | |
|---|---|---|
| 1 | I am a resident of Mahul village. We are the 1st native of Mumbai and our land was sold to M/s. Burmah Shell in the 1950s for installing this refinery. BPCL has been taking a lot of CSR initiatives in Mahul village and this has helped our residents immensely. Fishing is our sole occupation. I would like to know the answers of following after these new projects are started:<br>(i) How much effluent will be released into the sea? (ii) How much pollutants will be released into the air after commissioning of these new projects? (iii) What is spent catalyst? | Mr. SS Sunderajan, GM (Ops.) of BPCL replied that we had installed advanced Waste Water Treatment Plant (WWTP) and treated waste water is recycled back in process. After erection of these new plants, additional 130 M3/day waste water will be treated in existing WWTP & will be reused back in process. So there will be no effluents discharge outside on land or Sea.<br><br>Spent catalyst is the catalyst after usage in the refining process. This spent catalyst contains precious metals which are recovered before its disposal. The spent catalyst after metal recovery will be disposed to the MPCB approved CHWTSDF sites in scientific manner. |

The participants present in hearing requested for photo copy of minutes of public hearing & videography of the same. Hon,ble Chairman instructed convener to make necessary arrangement & announced that copy of the proceedings and CD to the public hearing will be available in due course of time in MPCB office at Shri Chatrapati Shivaji Maharaj Mandai Municipal Market Building, 4th Floor, Mata Ramabai Ambedkar Road, Mumbai- 400 001 . Also it was instructed to give a copy of EIA Report to those who need it by following prevailing office procedure.

The convener of the public hearing called upon the people present if there are any other question /issues, the same may be asked. However, nobody came with any question. Thereafter, The Chairman of the Committee while concluding the proceedings, summarized various points raised and declared that public hearing is ended, and he concluded the public hearing with vote of thanks.

| | | |
|---|---|---|
| **(P.V. Patil)**<br>**I/c. SRO, MPCB, Mumbai-III and Convener of Public Hearing Panel** | **(Dr. J.B. Sangewar)**<br>**RO, MPCB, Mumbai and Member, Public Hearing Panel** | **(Dr. Shivaji Patil)**<br>**Additional District Magistrate, Mumbai-Suburban and Chairman of Public Hearing Panel** |

# मे.भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (बीपीसीएल) यांच्या प्रस्तावित आधुनिकीकरण व विस्तारीकरण प्रकल्पाबाबत जाहिर जनसुनावणीचे इतिवृत्त

| | | |
|---|---|---|
| **जहीर सुनावणीची तारीख** | :– | २५/०९/२०१२ |
| **जहीर सुनावणीची वेळ** | :– | सकाळी ११.०० वाजता. |
| **जहीर सुनावणीचे ठिकाण** | :– | कम्युनिटी हॉल, तळमजला, फाईन आर्ट्स सोसायटी, फाईन आर्ट्स चौक, आर.सि.मार्ग, चेंबूर, मुंबई ४०० ०७१. |

**प्रस्तावना:–**

मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (बीपीसीएल) यांचे कडून माहुल स्थित, मुंबई रिफायनरी मध्ये '(१) हायड्रोक्रॅकर यूनिट (यूरो ४ व यूरो ३एमएस आणि डीझेल) ची पुर्न:बांधणी व कंटिन्यूअस कॅटॅलेटिक रिजनरेशन रिफॉर्मर यंत्रणेची उभारणी. (२)नवीन क्रुड डिस्टिलेशन यंत्रणा व व्हॅक्युम्स डिस्टिलेशन यंत्रणेची उभारणी व (३) अस्तित्वातील कॅटॅलेटिक रिफॉर्मिंग (सीआरयू) यंत्रणेची आयसोमरायझेशन यंत्रणेत बदल करणे' नियोजित आहे. त्या अनुषंगाने, प्रकल्पधारकाने वने व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांना अर्ज सादर केल्यानंतर, मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि.१३ व १४ एप्रिल २०१२ रोजी झालेल्या ३४ व्या बैठकीमध्ये '(१) हायड्रोक्रॅकर यूनिट (यूरो ४ व यूरो ३एमएस आणि डीझेल) ची पुर्न:बांधणी व कंटिन्यूअस कॅटॅलेटिक रिजनरेशन रिफॉर्मर यंत्रणेची उभारणी. (२) नवीन क्रुड डिस्टिलेशन यंत्रणा व व्हॅक्युम्स डिस्टिलेशन यंत्रणेची उभारणी या दोन प्रकल्पाबाबत Terms of Reference (TOR) जारी केले व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहिर सुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे सादर करण्याचे निर्देश आहेत.

त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापनाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पांकरीता अर्ज केले असून, मप्रनि मंडळाने जिल्हाधिकारी मुंबई (शहर) यांच्या परवानगीने २५/०९/२०१२ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतूदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि.२४.०८.२०१२ रोजीच्या मराठी दैनिक 'महाराष्ट्र टाईम्स' व इंग्रजी दैनिक 'इंडियन एक्सप्रेस' मध्ये नोटीस प्रसिध्द केली व त्यानुसार सर्व संबंधित व्यक्तींना आवाहन करुन त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी. संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत नमुद करण्यात आले होते.

कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत अ) जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (उपनगरे), ब) पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई, क) प्रादेशिक अधिकारी मुख्यालय, मप्रनि मंडळ, सायन, मुंबई, प्रादेशिक कार्यालय, मुंबई, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई ३, श्री छत्रपती शिवाजी महाराज महानगर पालिका मंडई, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, मुंबई - ४०० ००१ व ड) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र / उद्योग संचनालय, आय.सी.एल. बिल्डिंग, टाटा नगर समोर, व्ही.एन.पुरव मार्ग, चुनाभट्टी (पूर्व), मुंबई-२२ इ) सहाय्यक म.न.पा. आयुक्त, वार्ड ऑफिस, एम /पश्चिम, चेंबूर (पश्चिम), मुंबई येथे संबंधितांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते. उपरोक्त जाहीर जनसुनावणीबाबत नोटीफिकेशन मध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्प बाधित अथवा संबंधीत व्यक्तींना त्यांचे आक्षेप, टीका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

सुनावणीचे स्थळ कम्युनिटी हॉल, तळमजला, फाईन आर्ट्स सोसायटी, फाईन आर्ट्स चौक, आर.सि.मार्ग, चेंबूर, मुबई ४०० ०७१ येथे ठेवण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाजवळचे असून संबंधितांना येण्यासाठी सोईस्कर असल्याने याठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

सदर जनसुनावणी घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंद्रीय पर्यावरण व वन विभागाचे पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मधील तरतुदीप्रमाणे लोकसुनावणीचे खालील प्रमाणे समिती गठीत केली होती.

| | |
|---|---|
| १) डॉ.शिवाजी पाटील<br>अप्पर जिल्हा दंडाधिकारी<br>मुंबई उपनगर जिल्हा. | - अध्यक्ष |
| २) डॉ. जि.बा.संगेवार<br>प्रादेशिक अधिकारी, मुंबई | - सदस्य |
| ३) श्री.प्र.वि.पाटील,<br>प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई ३ | - आयोजक |

**जनसुनावणीचे इतिवृत्त :-**

जनसुनावणीच्या सुरूवातीस श्री.रा.रा.वसावे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई-२ यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यागतांचे स्वागत करून जनसुनावणीच्या पध्दतीबददल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक सुचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधीत लोकांसाठी आयोजित केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न / शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

तद्नंतर जन सुनावणी समितीचे अध्यक्ष अप्पर जिल्हादंडाधिकारी यांनी उपस्थित जनसमुदायास मे.भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (बीपीसीएल) यांचे प्रकल्पाबाबत आपल्या सुचना, विचार, आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरूपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सूचना, आक्षेप व आपल्या भावना कायद्यात नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीची छायाचित्रीकरण म.प्र.नि मंडळाकडून कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापूर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करून सुनावणीच्या इतिवृतांत बनविते वेळी सदर बाबी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी मे. भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि. (बीपीसीएल) यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांचे प्रश्न व प्रकल्पाबाबत शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने श्रीमती सुप्रिया सप्रे,मॅनेजर ( पर्यावरण ) यांनी सदर नियोजित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल खालील प्रमाणे मराठी व इंग्रजी भाषेत सादर केला. सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पांचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमिन, ध्वनी, विस्थापन इत्यादी बाबतची माहिती.
- नियोजित प्रकल्पांमुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता व वन यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालू झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापनविषयीची माहिती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहिती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर प्रश्न उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पांच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्याचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

१ श्री. राजकुमार शर्मा, डायमंड गार्डन, चेंबूर

| अ. क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्प धारंक/ आयोजक यांनी दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १ | चेंबूर उपनगरात माहूल हा परिसर सर्वात प्रदुषीत भाग असून या भागातील | समितीचे आयोजक यांनी सदर आक्षेपाबाबत उपस्थित जनसमुदायास उददेशून असे स्पष्ट केले की, पर्यावरण |

| | | |
|---|---|---|
| | लोकांना मे. बि. पी. सी. एल या कंपनीच्या प्रस्तावित नविन प्रकल्पाबाबतची माहिती लोकांना द्यावयाची होती. सदर प्रस्तावित प्रकल्प सर्वांच्या फायद्यासाठी असेलही परंतू म.प्र.नि. मंडळाने या प्रकल्पासंबंधी विस्तृत जाहिरात सर्व लोकांपर्यंत पोहचविलेली नाही. तेव्हा या प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाची प्रत मला देण्यात यावी तसेच आणखी वेळ देण्यात यावा जेणेकरून मला या अहवालाचा अभ्यास करुन काही मुद्दे उपस्थीत करता येतील. | आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदी नुसार, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व त्याची कार्यकारी सारांशाची प्रत संबंधीत विभागाच्या कार्यालयात नागरिकांच्या अभ्यासाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेले असून सर्व लोकांना या प्रकल्पाबाबत आपल्या सुचना, विचार, आक्षेप लेखी स्वरूपात पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांना सादर करण्याविषयी तसेच जाहिर सुनावणीचे आयोजन केल्याबाबत म.प्र.नि. मंडळाने सर्वाधीक खप असलेली इंडियन एक्सप्रेस इंग्रजी व महाराष्ट्र टाईम्स या मराठी या दैनिक वर्तमानपत्रात प्रकल्पाच्या जाहिर सुनावणीच्या दिनांकाच्या ३० दिवस अगोदर जाहिरात दिली. तसेच चेंबूर परिसरात विविध ठिकाणी सुचना फलक लावण्यात आले या प्रकारे सदर जुनसुनावणी बाबत योग्य ती प्रसिध्दी व पुरेसा वेळ देण्यात आला. त्यामुळे योग्य ती प्रसिध्दी दिलेली नाही हे म्हणने संयुक्तिक नाही. तसेच कायद्याच्या तरतुदीनुसार सुनावणी संपल्यानंतर प्राप्त मुद्यांची नोंद घेणे अभिप्रेत नाही. |
| २ | नियोजित प्रकल्पांकरीता किती क्षेत्रफळाचा उपयोग करण्यात येईल याबाबत तपशील देण्यात यावा. तसेच नविन प्रकल्पाकरीता किती जागा वापरण्यात येईल. | प्रकल्पधारक यांनी असे स्पष्ट केले की, मे.बी.पी.सी.एल., माहूल, चेंबूर रिफायनरी येथे या कंपनीकडे एकूण ४५० एकर एवढे क्षेत्रफळ असलेली जागा उपलब्ध असून त्यापैकी साधारणपणे १५ ते १६ % इतक्या क्षेत्रफळावर प्रोसेस युनिट स्थित असून उर्वरीत जागा साठवणूक टाकया, रोड, बागकाम इत्यादीने व्यापलेली आहे. नविन प्रकल्पाकरीता साठवणूक टाक्यांच्या जागेवर २५० x १०० चौ. मी. क्षेत्रफळाचा वापर करण्यात येईल. |

२ श्री. इ. सी. जॉन, सचिव, मैसूर को.ऑप. हौ. सोसायटी, चेंबूर

| अ. क्र | **चर्चेतील प्रश्न** | **चर्चेला अनुसरून दिलेली उत्तरे** |
|---|---|---|
| १. | मी, मैसूर को.ऑप. हौ. सोसायटी, चेंबूर चा सचिव असून मी येथे सोसायटीच्या ६०० रहिवाशांचा | समितीचे आयोजक यांनी सदर आक्षेपाबाबत मध्यस्थी करून उपस्थित जनसमुदायास उददेशून असे स्पष्ट केले की, पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ |

| | | |
|---|---|---|
| | प्रतिनीधी या नात्याने उपस्थित असून जाहिर सुनावणी समिती च्या नजरेस आणू इच्छितो की, आयोजकांनी या जाहिर जनसुनावणी विषयी विस्तृत प्रसिध्दी दिलेली नाही. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व त्याची कार्यकारी सारांशाची प्रती जवळपासच्या सर्व सोसायटयांना देण्यात याव्यात. मला या प्रकल्पाबाबतच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व त्याची कार्यकारी सारांशाची प्रत मिळालेली नाही, ती उपलब्ध करून देण्यात यावी. प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरण आघात काय होणार आहे या बाबत माहीती द्यावी तसेच या कंपनीला त्यांच्या पर्यावरण आघाताविषयी चा सखोल अभ्यास लोकांनी केल्यानंतर त्यांच्या सुचना अथवा आक्षेप प्राप्तझाल्याशिवाय परवानगी देण्यात येउ नये. | च्या तरतुदी नुसार, पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व त्याची कार्यकारी सारांशाची प्रत संबंधीत विभागाच्या कार्यालयात उपलब्ध करण्यात आले असून सर्व लोकांना आपल्या सुचना, विचार, आक्षेप लेखी स्वरूपात पर्यावरण व वने मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांना सादर करण्याविषयी म.प्र.नि. मंडळाने सर्वाधीक खप असलेली इंडियन एक्सप्रेस इंग्रजी व महाराष्ट्र टाईम्स या मराठी या दैनिक वर्तमानपत्रात प्रकल्पाच्या जाहिर सुनावणी बाबत ३० दिवस अगोदर जाहिरात दिली. तसेच चेंबूर परिसरात विविध ठिकाणी सुचना फलक लावण्यात आले या प्रकारे सदर जुनसुनावणी बाबत योग्य ती प्रसिध्दी देण्यात आली. त्यामुळे योग्य ती प्रसिध्दी दिलेली नाही हे म्हणने संयुक्तिक नाही. आयोजकांनी जाहिर सुनावणी बाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदी नुसार, आपली भुमिका बजावलेली आहे. सदर समितीची कार्यकक्षा ही या जनसुनावणीस उपस्थित जनसमुदायाच्या प्रश्नांची व सुचनांची नोंद घेऊन त्याचे इतिवृत्त तयार करुन ते शासनास सादर करण्यापुर्तीच मर्यादित आहे. |

३ श्री. दिपक वाधवानी, आशिष सिनेमा बिल्डींग, चेबूर

| अ. क्र | **चर्चेतील प्रश्न** | **चर्चेला अनुसरून प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे** |
|---|---|---|
| १. | श्री. इ. सी. जॉन यांनी उपस्थीत केलेल्या प्रश्नाविषयी तसेच मा. अध्यक्ष महोदय यांनी आयोजकांची जाहिर सुनावणी बाबतची भुमिकेबाबत मी सहमत आहे. मात्र चेंबूर परिसरातील वाहतूक कोंडी, रस्त्यांची दुरावस्था व प्रदुषणाचे प्रश्न दुर्लक्षीत करून चालणार नाही. त्यामुळे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व त्याची कार्यकारी सारांशाची प्रत तसेच या जनसुनावणीबाबतचे परिपत्रक | रिफायनरीमधुन होणाऱ्या उत्पादनाची वाहतुक ही जास्तीत जास्त प्रमाणात बंद नलिकेद्वारे करण्यात येत आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पामधुन होणारे उत्पादनाचे देखील वाहतुक ही बंद नलिके मार्फत करण्यात येईल. त्यामुळे रस्त्यावरील वाहतुकीची कोंडी नक्कीच कमी होईल. तसेच वायु प्रदुषणाचे सद्यस्थितीतील परिस्थिती घट होणे देखील क्रमप्राप्त आहे. |

| | | |
|---|---|---|
| | जवळपासच्या सर्व सोसायटयांना पुरवण्यात यायला हवे होते. वाहतुक कोंडी सोडविण्याकरीता काय उपाययोजना करण्यात येतील आणि या प्रकल्पांवर चेंबुर परिसरात प्रदुषणाचा काय परिणाम होईल? | |

४ श्री. पी. एस. रानडे, बालविकास संघ, चेबूर

| अ. क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक/ आयोजक यांनी दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | जाहिर सुनावणी बाबतची सुचना आयोजकांच्या संकेतस्थळावर उपलब्ध नाही. प्रकल्पधारकाने त्यांच्या सादरीकरणामध्ये सामाजिक बांधिलकी विस्तृत केलेले आहे. त्यात ब-याचशा सुधारणा व त्याची अंमलबजावणी अपेक्षित आहेत. कंपनीने आपले सादरीकरण उत्तमरित्या केले आहे. मात्र या प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरण आघात काय असतील? | समितीचे आयोजक यांनी संकेतस्थळाबाबतचा आक्षेपास अनुसरुन उपस्थित जनसमुदायास उददेशून असे स्पष्ट केले की, जाहिर सुनावणी बाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदी नुसार, आपली भुमिका बजावलेली आहे. प्रस्तावित प्रकल्पामध्ये आर.एल.एन.जी. सारखे सल्फर विरहीत इंधन वापरण्यात येणार असुन त्यामुळे सल्फर डाय ऑक्साईड तसेच नायट्रोजन ऑक्साईड उत्सर्जनाची मात्रा कमी होईल. तसेच प्रस्तावित प्रकल्प हे युरो-४ च्या मानकाप्रमाणे इंधन निर्मिती करीता असल्यामुळे मुंबई शहर तसेच देश पातळीवरील वाहनामुळे होणा-या प्रदुषणाच्या मात्रेत घट होईल. अस्तित्वातील सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा ही वाढीव सांडपाणी शुध्दीकरणाकरीता पुरेशी असुन प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा पुर्नवापर करण्यात येईल. |

५ श्री. अयुब खान, समाजसेवक सेवाभावी संस्था

| अ. क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक/ आयोजक यांनी दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | आयोजकांनी फक्त दोन दैनिक वर्तमानपत्रात जाहिरात दिली त्यामुळे सर्वांना जाहिर सुनावणी बाबतची माहिती | समितीचे आयोजक यांनी असे स्पष्ट केले की, जाहिर सुनावणी बाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदी नुसार, म.प्र.नि. मंडळाने आपली |

| | | |
|---|---|---|
| | मिळणे अशक्य आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाचा अभ्यास करुन आमचे मुद्दे मांडण्याकरीता किमान एक आठवडयाचा अवधी देण्यात यावा व तोपर्यंत सदर जनसुनावणी स्थगित करण्यात यावी.० | भुमिका बजावलेली आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रती संबंधित विभागांच्या कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. जनसुनावणीची प्रक्रिया पार पाडण्याकरीता कालमर्यादा निश्चित केल्यामुळे आता अभ्यासाकरीता जास्तीचा कालावधी देता येणार नाही. |

६ श्री. अविनाश तांबे, कुर्ला

| अ. क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारक/ आयोजक यांनी दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | पुर्वी मी चेंबुर येथे राहत होतो, आता कुर्ला येथे स्थलांतरीत झालो आहे. मला असे सुचवायचे आहे की, सदर जनसुनावणी बाबतची सुचना फलक हे मुख्य परिसरात जसे की, रेल्वे स्टेशन, चौक, नाका इ. ठिकाणी लावण्यात याव्यात ज्यामुळे जास्तीत जास्त लोकांना याबाबत माहिती होईल. एखाद्या अनपेक्षित आपत्ती प्रसंगी काय कारवाई केली जाईल. परदेशात ज्याप्रमाणे एखाद्या संवेदनशील कारखान्यापासून ३ ते ५ कि.मी. अंतरापर्यंत नागरी वस्ती वसविण्यात येत नाही, त्याप्रमाणे येथे सुध्दा अनुकरण झाले पाहिजे. | सद्यस्थितीत रिफायनरी ही ऑन साईट व ऑफ साईट आपत्ती व्यवस्थापनाकरीता अद्यावत संयत्रणासह सुसज्ज आहे. तसेच प्रस्तावित प्रकल्पांचे देखील HAZAP स्टडी करुन आपली आपत्ती व्यवस्थापन केली जाईल. |
| २ | अतिरेकी हल्ला किंवा युध्द प्रसंगी निर्माण होणाऱ्या कंपनीच्या व परिसराच्या सुरक्षेकरीता काय उपाययोजना आहेत ? | कंपनीच्या सुरक्षेकरीता केंद्र शासनाचा औद्योगिक सुरक्षा दल तैनात असतो. १९७१ च्या युध्द प्रसंगी कंपनीने आपले काही युनिट बंद केले होते व सतत जळत राहणारी ज्वालाफीत बंद केली. अशाप्रकारची काळजी घेणे क्रमप्राप्त असते. |
| ३ | म.प्र.नि.मंडळ किंवा केंद्र शासन यांनी प्रकल्पधारकांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर केल्यानंतर | केंद्र शासनाच्या अखत्यारितील मुल्यांकन तज्ञ समिती (Expert Appraisal Committee) यांनी प्रकल्पधारकाने सादर केलेल्या पर्यावरण आघात |

| | | |
|---|---|---|
| | नागरिकांच्या हितासाठी कोणते प्रश्न उपस्थित केले ? | मुल्यांकन अहवालाचा अभ्यास करुन Terms of Reference (TOR) दिलेला असून त्याची पुर्तता करण्याकरीता कंपनीस निर्देशित करण्यात आलेले आहे. |

७ श्री. इ. सी. जॉन, सचिव, मैसूर को.ऑप. हौ. सोसायटी, चेंबूर

| अ. क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्प धारंक/ आयोजक यांनी दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | महोदय अध्यक्ष तुम्ही या ठिकाणी मे. बि.पी.सी.एल. व म.प्र.नि. मंडळ यांच्या मध्ये न्यायाधिश आहात. माझा युरो-४ या इंधनाच्या निर्मीती साठी विरोध नाही आहे, परंतू मला जाणून घ्यायचे आहे की, जाहिर सुनावणी घेण्याबाबतची शासनाची भूमिका काय आहे, या प्रकल्पामुळे काय काय परिणाम होतील ? मी पुन्हा सुचवू इच्छितो की, पर्यावरण मुल्यांकन अहवाल परिसरातील सर्व लोकांना उपलब्ध करुन देण्यात यावा. | समितीचे अध्यक्ष यांनी असे स्पष्ट केले की, मी या ठिकाणी न्यायाधीश नसून या जनसुनावणीसाठी अध्यक्ष या नात्याने इथे उपस्थित आहे. सदर जनसुनावणीचे इतिवृत्त आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांसह पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील.<br><br>प्रकल्पधारकाने असे स्पष्ट केले की, प्रकल्पामध्ये काही नविन सुधारणा करावयाच्या झाल्यास किंवा प्रकल्पाची उत्पादन क्षमता वाढविण्याकरीता पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियमातील तरतुदीनुसार प्रकल्पबाधित लोकांचे म्हणणे विचारात घेणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे जाहिर सुनावणीची गरज असते. |

८ श्री. राजकुमार शर्मा, डायमंड गार्डन, चेंबूर

| अ. क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्प धारंक/ आयोजक यांनी दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | प्रकल्पाबाबतची माहिती व सादरीकरण प्रकल्पधारकाने देण्याऐवजी आयोजकांनी द्यावी. | पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम, २००६ च्या तरतुदीप्रमाणे प्रकल्पाबाबतची माहिती ही प्रकल्पधारकानेच द्यावयाची आहे. |

९ श्री. इ. सी. जॉन, सचिव, मैसूर को.ऑप. हौ. सोसायटी, चेंबूर

| अ. क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्प धारंक/ आयोजक यांनी दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | सद्य:स्थितीत कंपनीतून निघणाऱ्या उत्सर्जनाची पातळी काय आहे ? | सन २००५ मध्ये कंपनीस १३ टन प्रतिदिन $SO_2$ उत्सर्जन करण्याची परवानगी होती. त्यात कंपनीने प्रकल्पामध्ये केलेल्या विविध नुतनीकरणामुळे $SO_2$ ची पातळी साधारणपणे १२ टन प्रतिदिन इतकी खाली आणण्यात आली. तसेच सदरील १२ टन प्रतिदिन $SO_2$ ची पातळी ११ टन प्रतिदिन इतकी नविन प्रकल्प आल्यानंतर साध्य होणार आहे. कंपनी परिसरातील हवेची गुणवत्ता मोजून ती इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड कंपनीच्या गेटवर लावुन याबाबत लोकांना अवगत करण्यात येते. |

१० श्री.रमेश पाटील, माहुल गांव, मुंबई

| अ. क्र | चर्चेतील प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्प धारंक/ आयोजक यांनी दिलेली उत्तरे |
|---|---|---|
| १. | मी माहुल गांवचा रहिवाशी असून कंपनीने आपल्या सादरीकरणामध्ये दाखविलेल्या सामाजिक कार्याविषयी मी सहमत आहे. आमचा मुख्य व्यवसाय मासेमारी आहे. त्यामुळे माझ्या खालील प्रश्नांची उत्तरे मिळावी. | |
| | अ. किती प्रमाणात सांडपाण्याची विल्हेवाट समुद्रात करण्यात येईल ? | अ. प्रस्तावित नविन प्रकल्पामुळे १३० घनमीटर प्रतिदिन इतके सांडपाणी निर्मित होणार असून त्यावर प्रक्रिया करुन त्याचा पुर्नवापर करण्यात येईल. |
| | ब. स्पेंट कॅटॅलिस्ट म्हणजे काय ? | ब. रिफायनरीमध्ये रासायनिक प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी उत्प्रेरकांचा (कॅटॅलिस्ट) वापर करण्यात येतो व कालांतराने त्याची क्षमता कमी होते. या क्षमता कमी झालेल्या उत्प्रेरकांना स्पेंट कॅटॅलिस्ट संबोधण्यात येते. या स्पेंट कॅटॅलिस्टची विल्हेवाट |

| | | |
|---|---|---|
| | | शास्त्रोक्त पध्दतीने करण्यात येते. |
| | क. नविन प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर कंपनीमधून निघणाऱ्या उत्सर्जनाची पातळी काय असेल ? | क. विविध नुतनीकरणामुळे $SO_2$ ची पातळी साधारणपणे १२ टन प्रतिदिन इतकी खाली आणण्यात आली. तसेच सदरील १२ टन प्रतिदिन $SO_2$ ची पातळी ११ टन प्रतिदिन इतकी नविन प्रकल्प आल्यानंतर साध्य होणार आहे. कंपनी परिसरातील हवेची गुणवत्ता मोजून ती इलेक्ट्रॉनिक डिस्प्ले बोर्ड कंपनीच्या गेटवर लावुन याबाबत लोकांना अवगत करण्यात येते. |

उपस्थित जनसमुदायापैकी काही लोकांनी या सुनावणीचे इतिवृत्ताची प्रत, तसेच छायाचित्रीकरणाची ध्वनीफित मिळण्याबाबत विनंती केली असता, अध्यक्ष यांनी आयेजकांना इतिवृत्त व ध्वनीफित नियमानुसार देण्याबाबत सुचना केल्या. तद्नंतर आयोजकांनी लोकांना आव्हान केले की, तुमचे आणखी काही प्रश्न असतील तर ते उपस्थित करावे परंतु नंतर कोणी प्रश्न उपस्थित केले नाहीत.

अध्यक्षांनी जनसुनावणीच्या समारोपाच्या भाषणामध्ये जनसुनावणीचा आढावा घेतला व जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

( प्र.वि.पाटील )
प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, मुंबई-३
तथा
आयोजक
जनसुनावणी समिती

( डॉ.जि.बा.संगेवार )
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि.मंडळ, मुंबई
तथा
सदस्य
जनसुनावणी समिती

( डॉ.शिवाजी पाटील )
अप्पर जिल्हा दंडाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हा.
तथा
अध्यक्ष
जनसुनावणी समिती.